# बालकांसाठी ऑनलाइन सुरक्षाविषयक टिप्स



पॅन इंडिया
**साइबर वेलनेस हेल्पलाइन**
**७३५३१०७३५३**

info@responsiblenetism.org
www.responsiblenetism.org

# तुम्ही ऑनलाइन माध्यमांवर सुरक्षित आहात, असे तुम्हाला वाटते का?

## ऑनलाईन माध्यमांवर जबाबदारीने वागण्यासाठी सुरक्षाविषयक टिप्स:

- तुम्ही वापरत असलेल्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मसाठी वयाची पात्रता समजून घ्या
- सोशल मीडिया आणि गेमिंग प्लॅटफॉर्मच्या गोपनीयता मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करा
- ऑनलाइन गेम निवडण्यापूर्वी **www.pegi.info** किंवा **www.esrb.org** वर जाऊन गेमचे रेटिंग आणि कंटेंट तपासा
- अनोळखी किंवा असत्यापित स्त्रोतांकडून गेम किंवा कंटेंट डाउनलोड करणे टाळा
- गेमिंग किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सायबर बुलिंग कंटेंट ओळखण्यास शिका आणि प्रभावीपणे तक्रार करा
- लक्ष वेधून घेण्यासाठी बेकायदेशीर खेळ खेळणे किंवा आव्हाने स्वीकारणे आणि त्याबद्दल बढाया मारणे चांगले नाही, हे लक्षात ठेवा
- अफवा पसरवू नका, त्या अधिक भीतीचे वातावरण पसरवतात आणि हानी पोहोचवतात
- स्वतःवर नियंत्रण ठेवायला शिका आणि योजना आखून तुमचा स्क्रीन-टाइम कमी करा
- नाव, पत्ता, जन्मतारीख, संपर्क इत्यादी वैयक्तिक तपशील कधीही ऑनलाइन शेअर करू नका
- तुमची भाषा, मीम्स, व्हिडिओ आणि तुम्ही पोस्ट करत असलेला कंटेंट याबाबतीत संवेदनशील रहा
- कोणत्याही आक्षेपार्ह मजकुराविरुद्ध तुमचा आवाज उठवा. तुम्हाला जे अयोग्य वाटत असेल, अस्वस्थ करत असेल त्याचा विरोध करा. "नाही" म्हणण्याची हिंमत तुमच्यात आणा
- कोणत्याही व्यक्तीमुळे, गेममुळे किंवा ऑनलाईन क्रियांमुळे तुम्हाला भीतीदायक, अस्वस्थ, घाबरवून टाकणारे, लज्जास्पद किंवा गोंधळलेले वाटता कामा नये
- जेव्हा तुम्हाला एखादी आक्षेपार्ह घटना “मोठ्यांना सांगू नका” असे कुणाकडून सांगितले जाते, तेव्हा तुम्ही ती घटना/ बाब तुमच्या पालकांना किंवा शिक्षकांना आवर्जून सांगितली पाहिजे. ती शेअर करणे आवश्यक आहे
- लक्षात ठेवा, सोशल मीडिया केवळ 13+ वयोगटासाठी कायदेशीर आहे
- इतरांचे अकाउंट्स किंवा वायफाय हॅक करणे, बनावट खाती तयार करणे हे सायबर गुन्हे आहेत
- त्रास देण्याच्या उद्देशाने कोणाचा तरी ऑनलाइन पाठलाग करणे हा सायबर गुन्हा आहे
- त्रास देण्याच्या उद्देशाने फोटो आणि व्हिडिओ मॉर्फ करण्यासाठी साधने वापरणे हा देखील सायबर गुन्हा आहे
- कोणाही बरोबर आक्षेपार्ह कंटेंट / अयोग्य चित्रे / व्हिडिओ मागणे, दाखवणे (नग्न / अर्धनग्न) किंवा शेअर करणे हा गंभीर सायबर गुन्हा आहे
- जर तुम्हाला तुमच्या मित्र-मैत्रिणींमध्ये धोक्याची लक्षणे किंवा ऑनलाइन धमक्यांचे प्रकार आढळून आले, तर त्यांना प्रोत्साहन किंवा पाठींबा देऊ नका. त्यांना थांबवा, विरोध करा आणि त्यांच्या गैरवर्तनाची तक्रार करा

**स्वत: ची हानी करण्याचा प्रयत्न करू नका, तुमचे जीवन मौल्यवान आहे, तुम्ही जसे आहात तसे तुमच्या पालकांचे तुम्ही प्रिय आहात. विश्वासू प्रौढ व्यक्ती किंवा समुपदेशकाशी संपर्क साधा, तुमच्या भावनांबद्दल बोला**

## सोशल मीडियासाठी कायदेशीर वय:

| | |
|---|---|
| व्हाट्सअँप | १६ वर्षे |
| इंस्टाग्राम | १३ वर्षे |
| यूट्यूब | १३ वर्षे |
| डिस्कॉर्ड | १३ वर्षे |
| रेड्डीट | १३ वर्षे |
| फेसबुक | १३ वर्षे |
| स्नॅपचॅट | १३ वर्षे |

## गेमिंगचे नियम आणि त्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे:

- बँकिंग कार्ड लिंक करू नका, पैशांनी खेळणे टाळा
- पालकांच्या संमतीशिवाय गेममधील कोणत्याही गोष्टीची खरेदी करू नका
- गेम खेळण्यापूर्वी गेमचे नियम लक्षपूर्वक वाचा
- धमक्या देऊन कुणावर दबाव आणू नका आणि इन-गेम ऑफर्सच्या मोहात पडू नका
- डिस्कॉर्डवर तुम्ही कोणाशी कनेक्ट आहात ते सत्यापित (verify) करा
- सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींसोबत डिस्कॉर्ड लिंक शेअर करू नका
- मल्टीप्लेअर्स गेम तुमच्या ओळखीच्या लोकांसोबतच खेळा. अनोळखी लोकांसोबत खेळू नका किंवा अनोळखी लोकांना सहभागी करून घेऊ नका

## वयानुरूप ऑनलाइन गेम:

| | |
|---|---|
| ROBLOX | ७ वर्षे |
| MINECRAFT | ७ वर्षे |
| AMONG US | ९ वर्षे |
| FREE FIRE | १२ वर्षे |
| LEAGUE of LEGENDS | १२ वर्षे |
| HEARTHSTONE HEROES OF WARCRAFT | १२ वर्षे |
| FORTNITE BATTLE ROYALE | १२ वर्षे |
| FORTNITE | १२ वर्षे |
| DOTA 2 | १३ वर्षे |
| WORLD OF WARCRAFT | १३ वर्षे |
| PUBG | १६ वर्षे |
| CS GO COUNTER-STRIKE GLOBAL OFFENSIVE | १६ वर्षे |
| APEX LEGENDS | १६ वर्षे |
| grand theft auto | १८ वर्षे |
| CALL OF DUTY WARZONE | १८ वर्षे |
| TOM CLANCY'S RAINBOW SIX SIEGE | १८ वर्षे |

रेटिंग ESRB आणि PEGI

## तांत्रिक टिप्स:

- प्रत्येक ॲप, सोशल मीडिया प्रोफाइलसाठी गोपनीयता सेटिंग्ज म्हणजेच प्रायव्हसी सेटिंग फॉलो करा आणि अनोळखी व्यक्तीच्या ॲक्सेसला प्रतिबंध करा
- तुमचे वय 13 वर्षांखालील असल्यास तुमचे डीफॉल्ट ब्राउझर म्हणून **kiddle.com** आणि **YouTubeKids** वापरा
- प्रत्येक ऑनलाइन अकाऊंट्ससाठी वेगवेगळे कठीण पासवर्ड वापरा, ते नियमितपणे बदलत जा
- अधिकृत असलेले आणि अपडेट केलेले ॲंटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरा
- अनोळखी लोकांच्या डिव्हाईसेस वरून किंवा मोफत वाय-फायवरून सोशल मीडिया अकाऊंट किंवा बॅंकिंग अकाऊंट उघडणे टाळा
- प्रत्येकवेळी तुमची ऑनलाइन अकाऊंट्स लॉग आउट करण्याचे लक्षात ठेवा. गरज नसेल तेव्हा वाय-फाय, ब्लूटूथ आणि जीपीएस बंद करा
- **"https"** असलेल्या URL च नेहमी सुरक्षित असतात हे लक्षात ठेवा. अनोळखी लिंक उघडू नका. URL सत्यापित करा
- जे गरजेचे असतील तेच ॲप्स तुमच्या डिव्हाइसवर इंस्टॉल करा आणि इंस्टॉल करण्यापूर्वी त्यांचे नियम व अटी लक्षपूर्वक वाचा
- तुमच्या ऑनलाइन अकाऊंट्समध्ये इतर कोणालाही प्रवेश देऊ नका किंवा आणि इतरांना चालवायला देऊ नका

## QR कोडे स्कॅन करा, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स वर रिपोर्टींग करायला शिका :

**व्हाट्सॲप**

https://faq.whatsapp.com/408155796838822/?locale=en_US

**स्नॅपचॅट**

https://support.snapchat.com/en-US/a/report-abuse-in-app

**डिस्कॉर्ड**

https://discord.com/safety/360044103651-reporting-abusive-behavior-to-discord

**इंस्टाग्राम**

https://help.instagram.com/2922067214679225

**यूट्यूब**

https://support.google.com/youtube/answer/2802027?hl=en&co=GENIE.Platform%3DAndroid

**फेसबुक**

https://www.facebook.com/help/1380418588640631?helpref=hc_fnav

## महत्त्वाचे संपर्क:

**राष्ट्रीय साइबर अपराध हेल्पलाइन - १९३० | www.cybercrime.gov.in**

### रिस्पॉन्सिबल नेटिझम

**साइबर वेलनेस हेल्पलाइन ७३५३ १० ७३५३**

info@responsiblenetism.org | www.responsiblenetism.org

**आपत्कालीन परिस्थितीत, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक किंवा शाळेच्या समुपदेशकाशी संपर्क साधा**